**ठळक बातम्या**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर टप्प्याटप्प्याने होण्याची शक्यता
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभाचे पैसे महिनाभरात परत करण्यासाठी राज्य सरकारची १४ हजार पुरुषांना नोटीस
- एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी, स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरणालाही मान्यता
- नागरिकांना रिक्षा, टॅक्सीची सुविधा पुरवण्यासाठी राज्य सरकार छावा राइड ॲप सुरू करणार

**आणि**

- आगामी ४ दिवस राज्याच्या अनेक भागांमध्ये जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर ऑक्टोबर महिन्यात सुरू होणार असून ती पुढच्या वर्षी जानेवारी महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची तयारी सुरू असून प्रभाग रचना, मतदार याद्या या सर्व प्रकारच्या कार्यवाहीला वेळ लागणार आहे. त्यामुळं या निवडणुका टप्प्याटप्प्याने होणार असल्याची शक्यताही त्यांनी वर्तवली. नाशिक विभागातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पूर्व तयारीचा त्यांनी आज आढावा घेतला, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला

मान्यता दिल्याने सोडत पध्दतीने प्रभागातून आरक्षण काढण्यात येईल, असं त्यांनी सांगितले.  मतदार संख्या, मतदान केंद्र, आश्यक मनुष्यबळ, मतदान यंत्र आदींची तयारी आणि पूर्वनियोजन करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसंच या निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्यात येणार नाही असं वाघमारे यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड बाईट वाघमारे - (१४ सेकंद)**

**<><><><><><>**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला महायुतीकडून २० ते २५ जागा मिळावल्यात, अशी अपेक्षा पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली. जिल्हा परिषद निवडणुकीत  पाच आणि पंचायत समितीत एक जागा रिपब्लिकन पक्षाला मिळावी असं आठवले म्हणाले.

**<><><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या १४ हजार पुरुषांना पैसे परत करण्याची नोटीस राज्य सरकारनं पाठवली आहे. महिनाभरात पैसे परत नाही दिले नाही तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा सरकारनं त्यांना नोटीशीद्वारे दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून सुमारे साडे २१ कोटी रुपये या पुरुषांच्या खात्यात जमा झाले आहेत.

**<><><><><><>**

राज्य सरकारनं एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्त्वावर वापर करायच्या सुधारित धोरणाला मंजुरी दिली आहे. या धोरणानुसार महामंडळाच्या जमिनींच्या भाडेपट्टा कराराचा कालावधी आता ६० वर्षांऐवजी ४९ वर्षांच्या दोन टप्प्यात मिळून ९८ वर्षे करण्यास मंजुरी देण्यात आली. राज्य मंत्रीमंडळाच्या आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत १३ खासगी स्वयंसेवी संस्थांचं अनुदान प्रति रुग्ण २ हजारांवरून ६ हजार रुपये करायलाही मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि

नाविन्यता धोरणालाही सरकारनं मान्यता दिली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड - व्हाइस कास्ट - - (४५ सेकंद)**

*(आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फिनटेक, ॲग्रीटेक, मेडटेक, सेमीकंडक्टर्स, सायबर सुरक्षा, बायोटेक, स्पेसटेक, ब्लॉकचेन, क्वांटम कंप्यूटिंग, स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर, मोबिलिटी, डीपटेक यासारख्या उच्च क्षमतेच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्याचे उद्दिष्ट्ये या धोरणात आहे. या धोरणामुळे राज्यात येत्या पाच वर्षात सव्वा लाख उद्योजक घडतील आणि ५० हजार स्टार्टअप्स् सुरू होतील असे नियोजन आहे. यात ५०० कोटी रुपयांचा महाफंड स्थापन केला जाणार असून यातून सुरुवातीच्या टप्प्यातल्या २५ हजार उद्योजकांना मार्गदर्शन, इन्क्युबेशन आणि आर्थिक मदत दिली जाईल. यामुळे देशातली सर्वाधिक यामुळे राज्यात स्टार्टअप आणि युनिकॉर्न्स राज्यात स्थापन होण्याबरोबरच रोजगार निर्मिती आणि नाविन्यता क्षेत्रात राज्याची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होईल. )*

**<><><><><><>**

ओला, उबेर, रॅपिडोच्या धर्तीवर राज्य सरकार ‘छावा राइड’ या ॲपच्या माध्यमातून राज्य सरकार नागरिकांना खासगी वाहतूक सुविधा पुरवणार आहे. या ॲपवरुन नागरिकांना रिक्षा, टॅक्सी आणि बसचे आरक्षण करता येईल. एसटी महामंडळ हे ॲप सुरू करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**<><><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या नांदणी मठातली महादेवी हत्तीण परत आणावी, ही जनभावना लक्षात घेत, राज्य शासन या संदर्भात स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात भूमिका मांडेल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. महादेवी हत्तिणीच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**<><><><><><>**

कबूतरखाना अचानक बंद करणे योग्य नाही, त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था पूर्ण होईपर्यंत मुंबई महापालिकेनं कबुतरांना नियंत्रित खाद्यपुरवठा सुरू ठेवावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. कबुतरांसाठी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत त्यांची उपासमार

होऊ नये याकडे लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मुंबई महापालिकेला पक्षीगृह उभारण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

मराठी चित्रपटांना मल्टिप्लेक्समध्ये अतिरिक्त खेळ मिळवून देण्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. या समितीत गृहविभागासह संबंधित विभागांचे सचिव, निर्माते, मल्टिप्लेक्स मालक, चित्रपट महामंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. या समितीने दीड महिन्यात अहवाल सादर करावा, असे निर्देशही शिंदे यांनी दिले आहेत.

<><><><><>

राज्य सरकारनं यंदाचा छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार युनेस्कोमधले भारताचे प्रतिनिधी विशाल शर्मा आणि अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संघाला जाहीर केला आहे. ३ लाख रुपये, मानचिन्ह, प्रमाणपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. हे या पुरस्कारांचं पहिलंच वर्ष आहे. ऐतिहासिक वारसा स्थळांचं जतन संवर्धन करणाऱ्या आणि जागतिक स्तरावर त्यांची ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

<><><><><>

उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यात धराली इथं आज झालेली ढगफुटी आणि त्यानंतर खिरगंगा नदीला आलेल्या पुरामुळे चार नागरिकांचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक नागरिक बेपत्ता असल्याची प्राथमिक आहे. लष्कराच्या जवानांचं पथक, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि राज्य आपत्ती निवारण दलासह जिल्हा प्रशासनानं घटनास्थळी तातडीनं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं असून १५ ते २० नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं आहे. धराली परिसरात हॉटेल, रेस्टरेंट,रेस्ट

हाऊस असल्यामुळे तिथं अनेक नागरिक असण्याची शक्यता ही जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी  वर्तवली.

<><><><><><>

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अंदाजे पाच कोटी रुपये किंमतीचा गांजा तसंच दीड किलो वजनाचं सोनं जप्त केलं. याखेरीज एका विमानतळ कर्मचाऱ्याकडूनही १ कोटी ३९ लाख रुपये किमतीचं सोनं जप्त करण्यात आलं.

<><><><><><>

नर्मदा नदीवर वसलेल्या सरदार सरोवरात बुडालेली बोट रुग्णवाहिका ३ दिवसांनंतर बाहेर काढण्यात यश आलं. या रुग्णवाहिकेची कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

<><><><><><>

जळगाव महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ विजय घोलप यांना निलंबित करण्यात आलं आहे. सहकारी महिला डॉक्टरशी गैरवर्तन तसंच  जन्म-मृत्यू विभागात महिला कर्मचाऱ्याच्या जागी तिचा पती काम करणं, या प्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आलं आहे.  डॉ. घोलप यांची चौकशी केली जाणार आहे.

<><><><><><>

रत्नागिरी जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष हिराचंद परशुराम ऊर्फ हिराभाई बुटाला यांचं आज पुण्यात निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. त्यांना प्रियदर्शिनी इंदिरा गांधी पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. ते खेडमधल्या सहजीवन शिक्षण संस्थेचे अध्यक्षही होते.

<><><><><><>

राज्यातल्या सर्व कार्यालयांचं पॉश ऑडिट करावी अशी मागणी राज्य महिला आयोगानं राज्य सरकारकडे केली आहे. यानुसार महिलांसाठी कामाचे ठिकाण

म्हणून सुरक्षित आहे की नाही याची तपासणी व्हावी असं महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या. यामुळे कायद्याकडे दुर्लक्ष करणार्यांना, पळवाट शोधणाऱ्यांना चाप बसेल आणि महिलांना सुरक्षित वातावरण मिळेल, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

धुळे शहरात काल कानुबाई मातेच्या विसर्जनादरम्यान एक वृद्ध व्यक्ती पांझरा नदीत वाहून गेला. त्याचा शोध घेणाऱ्या एस.डी.आर.एफ.च्या पथकाला आज सकाळी त्याचा मृतदेह सापडला.

**<><><><><>**

नवी मुंबई महापालिकेच्या वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्रात टाकाऊ कपड्यांवर प्रक्रिया करून कापडी राख्या तयार करण्यात आल्या आहेत. या राख्या नागरिकांना सहज उपलब्ध व्हाव्यात म्हणून पालिकेचे विभाग कार्यालय आणि मुख्यालयात स्टॉल लावण्यात आले आहेत.

**<><><><><>**

राज्यात आजपासून पुढचे चार दिवस अनेक भागांमध्ये जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण तसंच गोव्यात अनेक ठिकाणी तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे. सध्या तामिळनाडूच्या किनारपट्टीवर चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होत असून, अरबी समुद्रात पूर्व-पश्चिम दिशा असलेला कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. त्यामुळे राज्यासह देशभरात हवामान बदलेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**//<><><><><>//**